# स्टेट बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज् (एम्. एस्. पटेल) को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

(रजि. नं. ६५२७/२९)

स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा बिल्डींग, तिसरा मजला, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.

वेब-साईट : www..sbimspatel.com ई-मेल : info@sbimspatel.com दूरध्वनी : २२६६ ४३६०, २२६६ १७८०


**संदर्भ क्र.** : परिपत्रक क्र.२०२१-२०२२/१ **दिनांक** : २३ मार्च २०२२

**सभासद बंधु-भगिनींनो,**

चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढीपाडव्या पासून सुरु होणारे नवीन वर्ष आपणां सर्वांना आनंदाचे व भरभराटीचे जावो.

**दिनांक ०६ मार्च २०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत खालील महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.**

**विना जामीन कर्ज योजना (Without Surety Loan)**

दि. २८ डिसेंबर २०२० पासून विना जामीन कर्ज योजना सुरु करण्यात आली. सदर योजनेस लाभलेला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता ती अधिकाधिक सुलभ आणि फायदेशीर व्हावी, त्याकरीता काही बदल करण्यात आले आहेत. या कर्ज योजने अंतर्गत कर्ज मर्यादा रक्कम रु.५,००,०००/- ठेवण्यात आली होती. त्यामध्ये वाढ करुन ती दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासून रु.७,००,०००/- करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कर्ज अर्जासोबत तारीख न टाकलेले ''स्टेट बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज् (एम्. एस्. पटेल) को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड'' या नावाने जोडण्यात येणाऱ्या धनादेशांची संख्या चार ऐवजी पाच करण्यात आली आहे, याची सभासदांनी नोंद घ्यावी.

**विश्रांतीगृहे (Holiday Homes)**

सोसायटीच्या वतीने मालवण, मडगाव (गोवा), महाबळेश्वर, आवास (अलिबाग), पुणे, नेरुळ (नवी मुंबई) आणि वडाळा (मुंबई) येथे सभासदांसाठी अल्पदरात विश्रांतीगृहे चालवण्यात येत आहेत. गेल्या ८ वर्षांत ह्या विश्रांतीगृहांच्या भाड्यात वाढ करण्यात आली नाही. या ८ वर्षांत विश्रांतीगृहांवरील खर्चात विविध कारणांनी भरीव वाढ झाली आहे. नगरपालिकेच्या करामध्ये झालेल्या वाढीबरोबरच पाणी, वीज आणि देखभालीवरील खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच भाडेतत्वावरील विश्रांतीगृहांच्या भाड्यात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. दिनांक ०६ मार्च २०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत याबाबत विस्तृत चर्चा झाली. त्यावेळी नवीन सुरु केलेल्या, नुतनीकरण झालेल्या व भाडेतत्वावरील विश्रांतीगृहांच्या शुल्कात सर्व वर्गांसाठी रु.१००/- ने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही भाडेवाढ दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासून महाबळेश्वर, आवास (अलिबाग), पुणे व नेरुळ (नवी मुंबई) विश्रांतीगृहांसाठी अमलात येईल, ती पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| चतुर्थश्रेणी वर्गासाठी | रुपये ३०० प्रतिदिन |
| लिपिक वर्गासाठी | रुपये ४०० प्रतिदिन |
| अधिकारी वर्गासाठी | रुपये ५०० प्रतिदिन |

तसेच मालवण, मडगाव (गोवा) व वडाळा (मुंबई) या विश्रांतीगृहांच्या दरात तूर्त कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

आपला नम्र,

**मुकेश भाटिया**
मानद् सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी